# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/12/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक

१) पोस्टे अरोली :– फिर्यादी ही सकाळी शाळेत एकटी पायी जात असता शाळेच्या छोट्या गेटजवळ यातील **आरोपी नामे– सोकेश चंद्रभान बारई, वय २३ वर्ष, रा. कोदामेंढी ता. मौदा जि. नागपुर** हा त्याचे मोटार सायकलने फिर्यादीच्या मागुन येवुन तिचा रस्ता अडवुन फिर्यादीस म्हणाला की, मला तुझ्या सोबत बोलायचे आहे असे म्हणुन फिर्यादीकडे पाहुन हसत होता. आरोपीच्या अशा वागण्यामुळे फिर्यादीस भिती वाटली व लज्जा उत्पन्न झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरूद्ध कलम ३४१, ३५४(ड) भांदवि सहकलम १२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनवणे हे करीत आहे.

२) पोस्टे रामटेक :– फिर्यादी कॉलेज संपल्यानंतर सायकलने मैत्रिणी सोबत घरी जात असता तिचे सायकलचे मागे मागे **आरोपी नामे– हिमांशु दिपक तांडेकर, वय २२ वर्ष रा. नंदापुरी ता. रामटेक जि. नागपूर** हा जाउन तिचा मोबाईल नंबरं विचारत होता. तेव्हा फिर्यादीने माझाकडे मोबाईल नाही आहे. असे म्हटले असता आरोपीने माझा फोन घे असे म्हटले असता फिर्यादीने फोन घेण्यास नकार दिला. व तुला माझ्या मोबाईल नंबरचे काय काम आहे. असे म्हणुन घरी जायला निघाली तेव्हा आरोपीने फिर्यादीचे मागे मागे मोटरसायकलने पाठलाग करत घरापर्यंत आला फिर्यादी घरात गेल्यानंतर आरोपी घरासमोरच्या पानठेल्यात जाउन बसला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरूद्ध कलम ३५४(ड) भांदवि., सहकलम ८, १२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनी स्वाती यावले पो.स्टे रामटेक मो. नं: ७४४७५९२२६५ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर